(58?) 7/ 8/11/24 4:20

# उल्हासनगर महानगरपालिका
## माहिती व जनसंपर्क विभाग

दिनांक : ०८/११/२०२४

## प्रेसनोट

मा. प्रशासक तथा आयुक्त श्री. विकास ढाकणे साहेब यांच्या आदेशानुसार व मा. अतिरिक्त आयुक्त डॉ. किशोर गवस यांच्या मार्गदर्शनानुसार छट पूजा महोत्सवाचे औचित्य साधून आज दिनांक ०८ नोव्हेंबर २०२४ रोजी सकाळी ८.०० वाजता हिराघाट बोट क्लब, उल्हासनगर - ३ येथे विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ मध्ये जास्तीत-जास्त मतदान करणेबाबत आवाहन करून मतदान जनजागृती करण्यात आली व मतदान शपथ घेण्यात आली.

यावेळी मा. मुख्य स्वच्छता निरीक्षक श्री. एकनाथ पवार साहेब, मा. जनसंपर्क अधिकारी श्रीमती. छाया डागळे मॅडम तसेच सर्व धर्म समभाव मित्र मंडळ, उल्हासनगर यांचे संस्थापक श्री. आर. आर. सिंह, कार्यवाहक श्री. अरविंद साहू, श्री. मन्नू सिंह, तसेच सर्व पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते.

त्यानंतर दुपारी १.०० वाजता उल्हासनगर महापालिका सार्वजनिक आरोग्य विभागातील अधिकारी व कर्मचारी यांच्याद्वारे बाईक रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. सदर रॅली मध्ये १५० मोटर सायकल सहभागी होऊन उल्हासनगर महानगरपालिका मुख्यालय येथून सुरू करून छत्रपती शिवाजी महाराज चौक ते फारवल लाईन ते सेंट्रल हॉस्पिटल रोड - पंडित जवाहरलाल नेहरू चौक - गोल मैदान - ०१ नं. पोलीस स्टेशन मार्गे उमपा शाळा क्र. २४ मार्गे मधुबन चौक - सी ब्लॉक चौक ते चोपडा कोर्ट मार्गे विराट अंबे स्पोर्ट्स क्लब पर्यंत काढण्यात आली. सदर रॅली सुरुवात करणे अगोदर मतदान करणेबाबत शपथ घेण्यात आली.

सदर रॅली मध्ये मा. जनसंपर्क अधिकारी श्रीमती छाया डागळे, मा. मुख्य बाजार निरीक्षक श्री. विनोद केणे, मा. मुख्य स्वच्छता निरीक्षक श्री. एकनाथ पवार, मा. भांडार विभाग प्रमुख श्री. अंकुश कदम तसेच सर्व स्वच्छता निरीक्षक, सर्व सफाई मुकादम व एकूण ३०० कर्मचारी उपस्थित होते.

8/11/24

(छाया प्रकाश डागळे)
जनसंपर्क अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका

प्रत :– माहितीस्तव.
मा. प्रशासक तथा आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका

प्रत :– योग्य त्या कार्यवाहिस्तव रवाना.
१) पत्रकार कक्ष, उल्हासनगर महानगरपालिका
२) सिस्टीम ॲनलिस्ट, माहिती तंत्रज्ञान विभाग, उल्हासनगर महानगरपालिका